महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक
संवर्गातील अधिकारी यांच्या सर्वसाधारण
बदलीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन आदेश:- संलेको २०१८/ प्र.क्र.६७ / कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२, दिनांक:- १७ मे, २०१८.

**शासन आदेश :-** महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील आणि वेतनश्रेणी रूपये १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ७६००/- या वेतनश्रेणीतील खालील विवरणपत्रात नमूद सहसंचालक यांना सध्याच्या पदावर तीन वर्षे कालावधी पूर्ण झाला आहे. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम- २००५ मधील तरतुदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद पदावर बदल्या करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव सध्याचे कार्यरत पद व ठिकाण | बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. जितेंद्र राजाराम इंगळे<br>सहसंचालक (संगणक), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई शहर | सहसंचालक (कोषागारे), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई शहर |
| २ | श्री. संजय चंद्रकांत शहा<br>वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई उपनगर | पदोन्नतीच्या क्षेत्रात असल्यामुळे मुदतवाढ |
| ३ | श्रीमती माधवी सुधीर इंगोले<br>सहसंचालक (वित्त व लेखा),<br>राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर | उपायुक्त, दुग्ध व्यवसाय व वित्तीय सल्लागार, आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई |
| ४ | श्रीमती राजश्री मिलींद राऊत<br>वित्त नियंत्रक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई उपनगर | सहसंचालक (प्रशासन), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई शहर |
| ५ | श्री. बाळासाहेब बाबुराव थिटे<br>सहसंचालक (कोषागारे), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई शहर | वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई उपनगर (श्रीमती राजश्री मिलींद राऊत यांच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर) |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांची बदली दर्शविलेली काही पदे ही प्रतिनियुक्तीची आहेत. सदर पदांवर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात येते. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर अधिकाऱ्यांची नियमित बदली त्या पदांवर दर्शविण्यात आली आहे.

कृ.मा.प.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करून संबंधित अधिकाऱ्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

४. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने सध्याच्या पदावरून कार्यमुक्त व्हावे आणि बदली झालेल्या पदावर रूजू व्हावे. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांचे नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांचा वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत संचालनालयास सादर करावा. तसेच सर्व अधिकाऱ्यांनी संचालनालयाने विकसित केलेल्या मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीमध्ये विहित नमुन्यातील माहिती भरून संगणक प्रणालीव्दारेच रूजू अहवाल देणे बंधनकारक राहील.

६. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandu

(मा. रा. गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) महालेखापाल- १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर. *
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
४) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. प्रधान सचिव ( ले व को ) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख. *
७) संबंधित अधिकाऱ्यांची बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख *
८) संबंधित अधिकारी *
९) निवडनस्ती, कोषा प्रशा- १ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत )